संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
19 JUN 2026
प्राप्त झाले सही........................

सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.
श्रीम. वनिता मारुती डोंगरे, लेखा अधिकारी.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश:-संलेको-२०२६/प्र.क्र.९९/E-१६८११९४/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १८ जून, २०२६.

<u>संदर्भ</u>:- १) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/स.प्र.का./व.मा. डोंगरे/४.२६/५१५/४३४/१९२२ दि.०७.०४.२०२६
२) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे आदेश क्र. शुनिप्रा /आस्थापना / १२९८ / २०२५, दि.१०.०९.२०२५
३) श्रीम. वनिता मारुती डोंगरे, लेखा अधिकारी यांचा अर्ज दि.१२.०९.२०२५
४) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/ श्रीम. वनिता डोंगरे/प्रतिक्षाधीन/ ०९-२०२५/५८५/१०८, दि.२३.०९.२०२५
५) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे आदेश क्र. का. आ. क्र. अलेका /आस्था - १ / ब / वै. न. / श्रीम. डोंगरे / ३०० A, दि.०१.१०.२०२५
६) वित्त विभाग, शासन आदेश क्र. संलेको २०२५/प्र. क्र. १५६ / कोषा. प्रशा - २, दि.१२.१२.२०२५
७) संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे आदेश क्र. संलेको / रोख /कार्या-१ / श्रीम. डोंगरे / प्रतिक्षाधीन / १२.२०२५ / ७७४, दि.१६.१२.२०२५
८) मुख्य प्रशासकीय अधिकारी, हापकीन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांचे आदेश क्र. ३२०/२०२५, दि. १९.१२.२०२५
९) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. अलेका/ आस्था - १ / ब / वै. न. / डोंगरे / १६० / २५९ / २०२६, दि.१७.३.२०२६

## -: <u>शासन आदेश</u> :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकरी संवर्गातील श्रीम. वनिता मारुती डोंरगे यांना संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयातून दि.१२.०९.२०२५ (म.पू.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

२. श्रीम. डोंगरे यांनी संदर्भीय क्र. ३ येथील दि.१२.०९.२०२५ रोजीच्या अर्जान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालयात दि.१२.०९२०२५ (म.पू.) रोजी हजर करुन घेण्यास विनंती केली.

319

३. संचालनालयाचे संदर्भीय क्र. ४ येथील दि.२३.०९.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. डोंगरे, यांना प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून संचालनालयात दि.१२.०९.२०२५ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात आले व त्यांची सेवा उपयोगात आणण्याकरिता अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात आली.

४. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे संदर्भीय क्र. ५ येथील दि.०१.१०.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. डोंगरे यांना दि.१७.०९.२०२५ (म.पू.) रोजी सदर कार्यालयात रुजू करुन घेण्यात आले.

५. शासन वित्त विभागाचे संदर्भीय क्र. ६ दि.१२.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेल्या श्रीम. डोंगरे यांना लेखा अधिकारी, हाफकीन प्रशिक्षण संशोधन व चाचणी संस्था, परेल, मुंबई या पदावर पदस्थाना देण्यात

22/06/26

01228/2026/165
22-06-26

आली. त्यानुसार संचालनालयाचे संदर्भीय क्र. ७ येथील दि.१६.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये सदर पदावर हजर होण्यासाठी श्रीम. डोंगरे यांना दि.१६.१२.२०२५ (म.नं.) रोजी संचालनालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

६. त्यानुसार हापकीन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांचे संदर्भीय क्र. ८ येथील दिनांक १९.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. डोंगरे यांना दि.१७.१२.२०२५ (म.पू.) रोजी रूजू करून घेण्यात आल्याबाबत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

७. श्रीम. डोंगरे, यांना दि. १२.०९.२०२५ ते १६.१२.२०२५ पर्यंत म्हणजेच एकूण ९६ दिवस नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.१२.९.२०२५ ते १६.०९.२०२५ | ५ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत |
| दि.१७.०९.२०२५ ते १५.१२.२०२५ | ९० दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत अधिदान व लेखा कार्यालयात कार्यरत |
| दि. १६.१२.२०२५ | १ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत |
| **एकूण** | **९६ दिवस** | |

८. श्रीम. डोंगरे यांना सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून कार्यमुक्त केल्यानंतर त्या तात्काळ संचालनालयात उपस्थित झाल्या होत्या व त्यांच्या सेवा उपयोगात आणल्या आहेत. त्यामुळे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्रीम. डोंगरे यांना प्रतिक्षाधीन कालावधी अनुज्ञेय होतो.

९. शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम क्र. ९ (१४) (फ) व ९ (१४) (जी) मधील तरतूदी विचारात घेता, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. वनिता मारुती डोंगरे यांचा दिनांक १२.०९.२०२५ ते दिनांक १६.१२.२०२५ पर्यंत एकूण ९६ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षेचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

तसेच, सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहायक अधिदान व लेखा अधिकारी (आस्थापना) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(ता.र.पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*
३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
५) सहायक अधिदान व लेखा अधिकारी (आस्थापना) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*
६) श्रीम. वनिता मारुती डोंगरे, लेखाधिकारी *
७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*
८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)